**महाराष्ट्र शासन**

**महसूल व वन विभाग,**

मुख्य इमारत, पहिला मजला, मादाम कामा मार्ग,
हुतात्मा राजगुरु चौक, मंत्रालय, मुंबई-४०००३२.

दूरध्वनी क्र.०२२-२२०४८२४७ Email ID : deskkh२-rfd@mah.gov.in

क्र:-गौखनि-४५/०६२५/प्र.क्र.१८२/ख-२/ई-१३४९५०० दिनांक : २८ फेब्रुवारी, २०२६

**विषय : गौण खनिज-अकोला**

मौजे गाजीपूर, ता.अकोट, जि.अकोला येथील ग.नं.३६ मधील क्षेत्रावर मंजूर करण्यात आलेल्या खाणपटटयाच्या अनुषंगाने जास्तीचे भरलेल्या स्वामित्वधनाची रक्कम परत करण्याबाबत.
- मे.प्रेरणा स्टोन क्रशर प्रो.प्रा. श्री.महेंद्र ज.तरडेजा

**शासन ज्ञापन:**

जिल्हाधिकारी, अकोला यांचे पत्र क्र.कक्ष-२९/खनिकर्म/स.म.अ./कावि-११८९/२०२५, दिनांक १५.०४.२०२५ रोजीच्या पत्राच्या अनुषंगाने कळविण्यात येते की, जिल्हाधिकारी अकोला यांनी दिनांक दिनांक ०७.०६.२०१० च्या आदेशान्वये मौजे गाजीपूर,ता.अकोट, जि. अकोला येथील ग.नं.३६ मधील ०१.२० हे.आर क्षेत्रावर पाच वर्षाकरिता मे.प्रेरणा स्टोन क्रशर प्रो.प्रा. महेद्रं जगदीशप्रसाद तरडेजा यांना मंजूर केला आहे. सदर खाणपटटयाचा कालावधी समाप्त झाल्यानंतर जिल्हाधिकारी अकोला यांनी दिनांक २२.०६.२०१६ च्या आदेशान्वये पाच वर्षाकरिता खाणपटटयाचे नूतणीकरण करण्यात आले आहे. सदर कालवधीत खाणपटटयाच्या अनुषंगाने वरीष्ठ उपसंचालक प्रादेशिक कार्यालय भुविज्ञान आणि खनिकर्म संचालनालय,नागपूर यांच्याकडून दिनांक ०५.०९.२०१७ रोजी ई.टी.एस मोजणी करुन घेण्यात आली त्यामध्ये खाणपटटयात ४९,७९०.३० ब्रास उत्खनन केल्याचे आढळून आले आहे. खाणपटटाधारक यांनी विविधी कालावधीत एकूण रू.०१,९४,८८,२००/- एवढे स्वामित्वधन शासन जमा केले.

०२. तदनंतर खाणपटटाधारक यांनी दिनांक १७.१२.२०२१ अन्वये मौजे गाजीपुर ता अकोट येथील स नं ३६ मधील खनिपटटा मंजूर असलेल्या खदान मधील जास्त भरलेले (फरक) स्वामित्वधन परत मिळणेबाबत अथवा जास्त भरलेल्या रकमेचे रॉयल्टी पासेस मिळणेबाबत विनंती केली असता, जिल्हाधिकारी अकोला यांनी दिनांक १२.०८.२०२२ रोजीच्या पत्रान्वये खाणपट्टाधारक यांनी फेब्रुवारी, २०१६ ते जानेवारी २०१९ दरम्यान स. नं. ३६, मौजे गाजीपूर, ता. आकोट जि. आकोला येथील खनिपट्टा मंजूर असलेल्या खदान मधील जास्त भरलेले (फरक) स्वामित्वधन परत मिळणेबाबत केलेला अर्ज अमान्य करण्यात आला. खाणपट्टाधारक यांनी जिल्हाधिकारी, अकोला यांच्या दिनांक १२.०८.२०२२ रोजीच्या पत्राविरुध्द खाणपट्टाधारक यांनी मा.मुंबई उच्च न्यायालय खंडपीठ नागपूर येथे रिट याचिका क्रमांक ११४३/२०२३ दाखल केली असता, मा.न्यायालयाने दिनांक २३.०९.२०२४ रोजी खालीलप्रमाणे प्रमाणे आदेश दिले.

**परिच्छेद क्र.५:-** Though he opposes the Petition contending that the Petitioner would not be entitled to the similar benefit, however, since it is not disputed, that

the Petitioner has paid the enhanced royalty for the aforesaid duration, during which the exemption has been granted by the communication dated २१.०८.२०१९, the Petitioner cannot be discriminated by applying a separate standard to the Petitioner, in view of which, the communication dated १२.०८.२०२२, is hereby quashed and set aside and it is held, that the Petitioner would be entitled to the difference in the royalty at the rate of Rs.१००/- per brass for the aforesaid duration.

**परिच्छेद क्र. ६:-** The Petition is accordingly allowed in the above terms. No costs.

**परिच्छेद क्र.७** :- Pending application/s, if any, shall stand disposed f accordingly.

**०३.** मा. मुंबई उच्च न्यायालय,खंडपीठ नागपूर यांनी रिट याचिका क्रमांक ११४३/२०२३ मध्ये दिनांक २३.०९.२०२४ रोजी दिलेले आदेश आणि महसूल व वन विभागाने सन २०१० व सन २०१५ या वर्षामध्य निश्चित केलेले स्वामित्वधनाचे दर, दिनांक ११.०५.२०१५ च्या अधिसूचना तसेच दिनांक ०३.०२.२०१६, दिनांक १९.०१.२०१९ आणि दिनांक २१.०८.२०१९ च्या पत्रान्वये सर्व विभागीय आयुक्त व जिल्हाधिकारी यांना देण्यात आलेल्या सूचना विचारात घेवून खाणपट्टाधारक यांनी दिनांक ०३.०२.२०१६ ते दिनांक १९.०१.२०१९ या कालवधीमध्ये दिनांक ११.०५.२०१५ रोजीच्या शासन निर्णयान्वये निश्चित केलेल्या स्वामित्वधनाच्या दरानुसार शासन जमा स्वामित्वधनाच्या खाणपट्टाधारक यांना देय होत असलेल्या परिगणनेनुसार अधिकची स्वामित्वधनाची रक्कम एकूण १३,२४,८५०/- परताव देण्याचा शासनाने निर्णय घेतला आहे. जिल्हाधिकारी, अकोला यांनी सदरील रक्कम अदा करण्यापूर्वी स्वामित्वधनाच्या परिगणनेनुसार लिलावधारक यांना देय होत असलेली स्वामित्वधनाची रक्कम एकूण १३,२४,८५०/-बाबत पूर्णत: खात्री करावी.

०४. सबब मे.प्रेरणा स्टोन क्रशर प्रो.प्रा. महेद्रं जगदीशप्रसाद तरडेजा यांनी मौजे गाजीपूर,ता.अकोट, जि. अकोला येथील ग.नं.३६ मधील ०१.२० हे.आर क्षेत्रावर मंजूर करण्यात आलेल्या खणपट्टयाच्या अनुषंगाने शासन जमा केलेल्या अधीकच्या स्वामित्वधनाची रक्कम परिगणीत करण्यात आली असून त्यानुसार परताव्याची रक्कम रु.१३,२४,८५०/- (रुपये तेरा लाख चोवीस हजार आठशे पन्नास फक्त), त्यांनी सदर रक्कम प्रत्यक्षात शासनाकडे जमा केल्याची व यापूर्वी ही रक्कम अदा केलेली नाही याची खातरजमा करुन घेण्याच्या अटीवर अदा करण्यास शासन ज्ञापनाद्वारे मान्यता देण्यात येत आहे .

०५. या बाबीवर होणारा खर्च सन २०२५-२०२६ या चालू वर्षाकरीता लेखाशिर्ष "०८५३-अलोहयुक्त खाणी व धातुशास्त्रीय उद्योग "१०२-खनिजबाबत सवलत फी व स्वामित्वधन, ९००, अलोहयुक्त खाणकाम व धातुशास्त्रीय उद्योग-वजा परतावे (००) (०१) वजा परतावे (०८५३ ००८६) खाली वजा परतावे देण्याकरीता करण्यात आलेल्या उपलब्ध अंदाजपत्रकीय तरतूदीमधून खर्ची टाकून भागविण्यात यावा.

०६. सदर शासन ज्ञापन वित्त विभागाच्या क्र.अनौ.स.क्र.-५४८/२०२५/व्यय-९, दिनांक २९.०९.२०२५ च्या सहमतीच्या अनुषंगाने सदर ज्ञापन निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन ज्ञापन महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संकेतांक २०२६०२२८१५५७१८२११९ असा आहे. हे शासन ज्ञापन डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकीत करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नांवाने,

SADANAND GOVIND MOHITE

Digitally signed by SADANAND GOVIND MOHITE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=REVENUE AND FORESTS DEPARTMENT, 2.5.4.20=9BD008875B6A3A9FDDAD3E55FE0328DF13A27221CB2BBC67ABD0155F914EFC01, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=6590E2301450C474B246074049174C79201BCAD9E5EB15E8F21C282EAEFEDA38, cn=SADANAND GOVIND MOHITE
Date: 2026.02.28 15:58:24 +05'30'

**(सदानंद गो. मोहिते)**
**कार्यासन अधिकारी, महसूल व वन विभाग**

**प्रति,**

**जिल्हाधिकारी, अकोला**

**प्रत:**

१. विभागीय आयुक्त, नागपूर विभाग, नागपूर.
२. प्रधान महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता)-२, नागपूर.
३. प्रधान महालेखापाल (लेखापरीक्षा)-२, नागपूर.
४. जिल्हा कोषागार अधिकारी, अकोला.
५. निवडनस्ती “ख-२” कार्यासन, महसूल व वन विभाग, मंत्रालय, हुतात्मा राजगुरू चौक, मादाम कामा मार्ग, मुंबई -४०० ३२.